(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय, भाग-६ अ करिता)

क्र. पोमसं/३-अ/१०/जीटी-१८/पोनि (अभि)/१७/२०१८
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा,
मुंबई- ४०० ००१.
दिनांक :- २७/०४/२०१८.

वाचा :- १) महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१
२) आस्थापना मंडळ क्र. २ यांचे दि. २०/०४/२०१८ च्या बैठकीचे इतिवृत्त.

## आदेश

महाराष्ट्र पोलीस कायदा कलम २२ न (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांनी कायद्याप्रमाणे **विहीत कालावधी पुर्ण झालेल्या** बिनतारी संदेश विभागातील पोलीस निरीक्षक (अभि.) यांच्या पदस्थापनेस खालीलप्रमाणे मान्यता दिली आहे. :-

| अ.क्र. | पोलीस निरीक्षक (अभि.) यांचे नांव | सध्याचे नेमणुकीचे ठिकाण | बदलीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | अरुण चिंतामण काळे | लोहमार्ग, नागपूर | पोलीस अधीक्षक, बि.सं. पूर्व विभाग, नागपूर |
| २ | सुरेश हशा पाटील | मुंबई शहर | ठाणे शहर |
| ३ | दत्तात्रय रामचंद्र भोईर | मुंबई शहर | एक वर्षाकरीता मुदतवाढ |
| ४ | विश्वास प्रभाकर देशपांडे | मुंबई शहर | एक वर्षाकरीता मुदतवाढ |
| ५ | मिलींद यशवंत बुचके | अहमदनगर | संचालक, बि.सं. कार्यालय, पुणे |
| ६ | धनजंय सोमनाथ इंगळे | बि.सं. संचालक कार्यालय,पुणे | एक वर्षाकरीता मुदतवाढ |
| ७ | श्रीकांत अनंत वेणेगुरकर | उस्मानाबाद | नवी मुंबई |
| ८ | समीर नारायण सांळुखे | नवी मुंबई | सिंधुदुर्ग |
| ९ | सतीश प्रतापसिंग चव्हाण | बि.सं. पुर्व विभाग, नागपूर | पोलीस अधीक्षक, लोहमार्ग नागपूर |
| १० | सचिन नारायण पिठे | लातूर | उस्मानाबाद |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | शशांक नंदू पवार | रत्नागिरी | एक वर्षाकरीता मुदतवाढ |
| १२ | अजयकुमार अमरनाथ मिश्रा | चंद्रपूर | एक वर्षाकरीता मुदतवाढ |
| १३ | टिपसिंग भारतसिंग राजपुत | संचालक बि.सं., कार्यालय पुणे, (सध्या प्रतिनियुक्ती सी.सी.टी.एन.एस) | अहमदनगर (प्रतिनियुक्तीवर सी.सी.टी.एन.एस., पुणे) |

२. संबंधीत घटक प्रमुखांनी या आदेशांची प्रत, आणि बदली ठिकाणी कार्यमुक्त करण्यात आलेल्या आदेशांची प्रत, उक्त पोलीस निरीक्षकांना व्यक्तिश: अदा करुन, त्या आदेशांच्या दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेवून, त्या पोंच या कार्यालयास सत्वर सादर कराव्यात.

३. संबंधीत घटक प्रमुखांनी **उपरोक्त बदली आदेशाधिन असलेल्या उक्त पोलीस निरीक्षकांना बदलीवर सोडताना पर्यायी/ बदलीवर येणा-या पोलीस निरीक्षकांची वाट न पाहता, बदलीवरील नेमणुकीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे.** तसेच, सदर पोलीस निरीक्षकांना बदलीवर कार्यमुक्त केल्याचा दिनांक संबंधीत घटक प्रमुखांनी, **या कार्यालयास दिनांक १५/०५/२०१८ पुर्वी (कार्यासन क्रमांक ३-अ यांना लक्षवेध करुन)** निश्चितपणे कळवावा.

४. उपरोक्त आदेशान्वये बिनतारी संदेश विभागातील पोलीस निरीक्षकांची बदली ज्या घटक कार्यालयात दर्शविण्यात आली आहे, तेथे सदर पोलीस निरीक्षक (अभि.) हजर होण्याची जबाबदारी बदलून गेलेल्या ठिकाणच्या पोलीस घटक कार्यालयाची राहील, याची नोंद घ्यावी. त्यासाठी त्यांनी पाठपुरावा करावा. विहित वेळेत हजर न होणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

५. संबंधीत घटक प्रमुखांनी, **त्यांच्या घटकात बदलून येणारे जे पोलीस निरीक्षक या आदेशांनुसार बदलीवर नेमणुकीच्या ठिकाणी हजर होणार नाहीत, त्यांची नावे** कृपया या कार्यालयास **कार्यासन क्रमांक ३-अ यांना लक्षवेध करुन** फॅक्सद्वारे कळवावीत. तसेच, **त्यांच्या घटकातून बदलून जाणारे जे पोलीस निरीक्षक बदलीवर हजर होण्याचे टाळून रुग्णनिवेदन करतील, अशा पोलीस निरीक्षकांनाही त्यांनी रुग्णनिवेदन केलेल्या दिनांकापासून बदलीवर कार्यमुक्त केल्याचे (deemed relieved) दर्शविण्यात यावे,** आणि त्याबाबतचा स्वतंत्र अहवालदेखील या कार्यालयास **कार्यासन क्रमांक ३-अ यांना लक्षवेध करुन** फॅक्सद्वारे व desk३a.dgoffice@mahapolice.gov.in या ई-मेल वर सत्वर सादर करावा. तसेच, संबंधीत घटक प्रमुखांनी **अशा संबंधीत पोलीस निरीक्षकांविरुध्द या कार्यालयाचे पत्र क्र. २/५५/०७, दि. १६/०९/१९८३, दि. ११/०१/१९८४, व दि. १०/०२/१९९१, तसेच परिपत्रक क्र.पोमसं/३/५५०७/६/९, दि. १३/०२/१९९७ मधील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी, व तसाही अनुपालन अहवाल या कार्यालयास कार्यासन क्रमांक ३-अ यांना लक्षवेध करुन सत्वर सादर करावा.**

६. पदस्थापनेच्या आदेशांची अंमलबजावणी करण्याबाबत सर्व संबधीत घटक प्रमुखांनी वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

७. सदर आदेश http://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर **FLASH** या शिर्षाखाली देखील उपलब्ध आहेत.

**(राजकुमार व्हटकर)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे
अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म.रा., मुंबई
पोलीस आयुक्त, नवी मुंबई/ ठाणे शहर
विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र/ कोल्हापूर परिक्षेत्र/कोकण परिक्षेत्र/अमरावती परिक्षेत्र/ औरंगाबाद परिक्षेत्र
पोलीस अधीक्षक, लोहमार्ग नागपूर/ अहमदनगर/ उस्मानाबाद/ लातूर/ रत्नागिरी/ चंद्रपूर/ सिंधुदुर्ग
पोलीस अधीक्षक, बि.सं., पुर्व विभाग, नागपूर

**प्रत सविनय सादर :-**

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृहविभाग,
दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२

**प्रत आवश्क त्या कार्यवाहीसाठी :-**

महालेखापाल-१, मुंबई व महालेखापाल-२, नागपूर (सस्नेह)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
कोषाधिकारी , नागपूर/ अहमदनगर/ उस्मानाबाद/ लातूर/ रत्नागिरी/ चंद्रपूर/ सिंधुदुर्ग/ ठाणे
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई
(सदर आदेश संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी)

प्रत :-

कार्यासन अधिकारी, का.क्र. २, १६, ३६ व ४०.